जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024
लोकमत

# पालींच्या चार नव्या प्रजातींचा लावला शोध

## विद्यापीठाचे संशोधक : विशेषांक प्रकाशित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्रातील वायव्येकडील घाटामधून निमास्पिस कुळातील पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध लावण्यात शिवाजी विद्यापीठ आणि ठाकरे वाइल्डलाइफ फाउंडेशनमध्ये कार्यरत संशोधकांना यश आले. या संशोधनाची दखल प्राणीशास्त्राच्या क्षेत्रातील आघाडीच्या 'झूटॅक्सा' या शोधपत्रिकेकडून घेण्यात आली असून, ऑकलँड (न्यूझीलंड) येथील या शोधपत्रिकेने केवळ या संशोधनाला वाहिलेला ११४ पृष्ठांचा विशेषांक मंगळवारी प्रकाशित केला.

हे संशोधन अक्षय खांडेकर या विद्यार्थ्याच्या प्राणीशास्त्र अधिविभागांतर्गत सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग आहे. डॉ. सुनील गायकवाड त्याचे मार्गदर्शक आहेत. या संशोधनामध्ये ठाकरे वाइल्डलाइफ फाउंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, सत्पाल गंगलमाले आणि डॉ. ईशान अगरवाल यांचाही महत्त्वाचा सहभाग आहे. या पालींच्या वैशिष्ट्यपूर्ण गोल बुबुळांवरून त्यांचा समावेश निमास्पिस या कुळात केलेला आहे. 'निमास्पिस बर्कीएन्सिस' या प्रजातीचा शोध बर्की (शाहूवाडी), वाशी (पन्हाळा) आणि तळये बुद्रुक (गगनबावडा) या ठिकाणी लागला.



निमास्पिस बर्कीएन्सिस



निमास्पिस चांदोलीएन्सिस



निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस



निमास्पिस सह्याद्रीएन्सिस

28 MAR 2024 THE TIMES OF INDIA

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Four wild gecko species discovered in Sahyadri


Rahul.Gayakwad@timesgroup.com

**Kolhapur:** Researchers from Shivaji University, Kolhapur (SUK) and Thackeray Wildlife Foundation have discovered four new species of wild geckos in the genus Cnemaspis in Northwest Maharashtra.

Dr Sunil Gaikwad, a professor in the Zoology department of SUK, said, "These geckos of the Cnemaspis clan are known for their territorial loyalty. They are spread in a small area and survive only in cooler climates. Therefore, their range of occurrence is limited to favourable places. The newly discovered geckos have not been found anywhere else outside their area of occurrence during these research expeditions."

The discovery is part of an ongoing PhD research by Akshay Khandekar.

Pic courtesy: Akshay Khandekar




The newly discovered gecko species

The research paper — A preliminary taxonomic revision of the girii clade of South Asian Cnemaspis Strauch, 1887 (Squamata: Gekconidae) with the description of four new species from South Maharashtra, India' — under the guidance of Gaikwad and with the help of Tejas Thackeray, Satpal Gangalmale and Dr Ishaan Agarwal from Thackeray Wildlife Foundation, has been published in Zootaxa, an international journal from New Zealand.

"Moreover, the three species found in Chandoli National Park were within 8 to 12km of each other and may have been limited by patchy grasslands in between dense forests. Such extreme territoriality is a characteristic of the geckos of the Cnemaspis clan," Gaikwad said.

"We have named one of the four new species Cnemaspis barkiensis after Barki Reserve Forest in Kolhapur district.

"The remaining three species were found in Chandoli National Park. We have named them Cnemaspis chandoliensis (after Chandoli National Park), Cnemaspis maharashtraensis (after the state), and Cnemaspis sahyadriensis (after Sahyadri Tiger Reserve and mountain range)," said Khandekar.

**Important role in food chain**

All these four newly discovered geckos are diurnal. They are found on stumps of trees and in the shadows of stones. Small insects are their main food and these geckos play an important role in maintaining balance in the food chain.

2 8 MAR 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. जगन कराडे यांना जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. जगन कराडे यांना नागपूर येथील जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे देण्यात येणारा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातून डॉ. कराडे यांचे अभिनंदन होत आहे.



शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. कराडे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी म्हटले आहे.

रविवार (दि. ३१ मार्च) सीताबर्डी- नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या मधुरम सभागृहात सकाळी ११ वाजता पुरस्कार वितरण होईल.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस, छत्रपती संभाजीनगर येथील मिलींद महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, नाटककार डॉ. सुनील रामटेके, ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. विद्याधर बनसोड उपस्थित राहणार आहेत.

डॉ. कराडे यांचे राष्ट्रीय आणि आंतराराष्ट्रीय पातळीवर १२ संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यातील दोन ग्रंथ केंब्रीज स्कॉलर पब्लिकेशन, लंडन येथून प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024
पुण्यनगरी

# डॉ. जगन कराडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. जगन कराडे यांना नागपूर येथील जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी सांगितले. रविवार, दि. ३१ मार्च रोजी सीताबर्डी-नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या मधुरम सभागृहात सकाळी ११ वाजता हा पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, नाटककार डॉ. सुनील रामटेके, ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. विद्याधर बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024

सकाळ

# प्रा. जगन कराडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार


डॉ. जगन कराडे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. जगन कराडे यांना नागपूर येथील जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी दिली. सीताबर्डी- नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या मधुरम सभागृहात रविवारी (ता. ३१) सकाळी अकरा वाजता पुरस्कार वितरण होणार आहे. डॉ. कराडे यांचे बारा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024
लोकमत

# डॉ. जगन कराडे यांना डॉ. आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. जगन कराडे यांना नागपूर येथील जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे देण्यात येणारा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर केला. शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. येत्या रविवारी (दि. ३१ मार्च) सीताबर्डी- नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या मधुरम सभागृहात सकाळी ११ वाजता पुरस्कार वितरण होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस, छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024
पुण्यनगरी

# काव्य परंपरेचे शिखर म्हणजे संत तुकारामांचे काव्य

## डॉ. रणधीर शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तुकारामांनी गाथेमधून मानवी जीवनातील वैश्विक सत्य अभंगाद्वारे मांडताना लयबद्धता, नादमयता, प्रचलित समाजाची भाषा आणि खेडूतांच्या बोलीभाषेचा आविष्कार पाहावयास मिळतो. म्हणूनच संत तुकारामांची काव्यप्रतिभा ही भारतीय काव्य परंपरेचे शिखर मानावे लागेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

ताराराणी विद्यापीठामध्ये तुकाराम बीजनिमित्ताने आयोजित कार्यक्रमात 'संत तुकाराम : कवी आणि संत' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. प्रारंभी शाहीर डॉ. आझाद नायकवडी व विद्यार्थिनी यांच्या वतीने अभंग गायन झाले. यावेळी उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, विश्वस्त जे. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन एस. डी. चव्हाण यांनी केले. निमंत्रितांचा परिचय डॉ. सुजय पाटील यांनी करून दिला. आभार एस. पी. पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 MAR 2024
तरुण भारत

# 'मास्टर ऑफ रुरल स्टडीज' अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अंतर्गत असणारा 'मास्टर ऑफ रुरल स्टडीज" (एम. आर. एस.) हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तयार केला आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची संरचना तयार केली आहे. त्यासाठी अभ्यासक्रमामध्ये उद्योजकता, कृषी, कृषी-प्रक्रिया, ग्रामीण उद्योग, उद्योजकता विकास, अर्थशास्त्र, सांख्यिकी, नैसर्गिक सांसाधने, पर्यावरण, विपणन, वित्त, सामाजिक सुधारणा, मानवी संसाधन विकास, नवोपक्रम व स्टार्टअप, समुदाय विकास, ग्रामीण विकास कार्यक्रम व योजना, सहकार, माहिती-तंत्रज्ञान, अंतरराष्ट्रीय व्यापार, पर्यटन, व्यक्तिमत्व विकास व कौशल्य आदी घटकांचा समावेश आहे. कोणत्याही विषयातील पदवीधारक वा पदवीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी मास्टर ऑफ रुरल स्टडीज अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील ऑनलाइन ॲप्लिकेशन फॉर्म भरून प्रवेश घ्यावा, असे आवाहन एम.आर.एस. अभ्यासक्रम समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी केले.

2 8 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उन्हाळी सत्रात तेरा दिवसांत लागणार निकाल

## शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची तयारी; त्रुटी दूर करून नियोजन

■ संतोष मिठारी :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : वेळेत निकाल जाहीर करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेले मूल्यमापनाचे प्रारुप (मॉडेल) यशस्वी ठरले आहे. त्याच्या अंमलबजावणीमुळे हिवाळी सत्रातील ६० टक्के परीक्षांचे निकाल सरासरी चौदा दिवसांमध्ये जाहीर झाले. आता उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू असून त्यांचे निकाल तेरा दिवसांत लावण्याची तयारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केली आहे.

> 'कमी दिवसांत मूल्यमापनाचे मॉडेल यशस्वी ठरले असून त्याची कुलपती कार्यालयाने प्रशंसा केली आहे. या मॉडेलच्या यशस्वीतेमध्ये कुलगुरुंसह, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. आता यापुढील सर्व परीक्षांचे निकाल सरासरी तेरा दिवसांत जाहीर करण्याची तयारी परीक्षा मंडळाने सुरु केली आहे.
> **-डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

या उन्हाळी सत्रात ७०० परीक्षा होणार आहेत. त्याची सुरवात २२ मार्चपासून बी. व्होक. अभ्यासक्रमाच्या परीक्षांपासून झाली आहे. त्यापाठोपाठ बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बीसीए., बीबीए परीक्षांचा प्रारंभ झाला. पारंपरिक अभ्यासक्रमासह एम. एस्सी., एम. ए. च्या परीक्षा एप्रिलअखेर, अभियांत्रिकी, विधी (लॉ) अभ्यासक्रमाच्या मे महिन्यामध्ये आणि एलएलएम अभ्यासक्रमाची परीक्षा जुलैमध्ये होतील. या सर्व परीक्षांचे निकाल सरासरी तेरा दिवसांमध्ये जाहीर करण्याची तयारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केली आहे. घेण्यात आलेल्या परीक्षांतील प्रश्नपत्रिकांचे मूल्यमापन दोन एप्रिलपासून सुरू होईल. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील मूल्यमापन केंद्रांमध्ये कार्यशाळा घेवून प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

### गेल्यावर्षीच्या दोन सत्रांतील निकालाचे चित्र

**मार्च २०२३ (उन्हाळी सत्र)**
एकूण परीक्षा : ६८०
० ते १५ दिवसांत जाहीर झालेल्या निकालाचे प्रमाण : ५१ टक्के
१६ ते ३० दिवसांत जाहीर झालेल्या निकालाचे प्रमाण : ४९ टक्के
निकाल जाहीर झालेले सरासरी दिवस : १४.५

**ऑक्टोबर २०२३ (हिवाळी सत्र)**
एकूण परीक्षा : ६६२
० ते १५ दिवसांत जाहीर झालेल्या निकालाचे प्रमाण : ६० टक्के
१६ ते ३० दिवसांत जाहीर झालेल्या निकालाचे प्रमाण : ४० टक्के.

### विद्याशाखानिहाय परीक्षांची संख्या

| विद्याशाखा | उन्हाळी सत्र | हिवाळी सत्र |
|---|---|---|
| विज्ञान-तंत्रज्ञान | २९८ | ३४५ |
| वाणिज्य-व्यवस्थापन | १८३ | १६९ |
| मानव्यशास्त्र | ८४ | ७१ |
| आंतरविद्याशाखीय अभ्यास | ११५ | ७७ |

### परीक्षेवर २३ पथकांची नजर

■ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेत कॉपीचे प्रकार घडत असून त्याला आळा घालण्यासह त्यावर नजर ठेवण्यासाठी परीक्षा मंडळाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हानिहाय दोन भरारी पथके आणि वीस महाविद्यालयांमध्ये १७ बैठी पथके तैनात केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024
सकाळ



इचलकरंजी : कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रिया चव्हाण, प्रणाली कोपार्डे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला.

# प्रिया चव्हाण, प्रणाली कोपार्डे यांची विद्यापीठ संघात निवड

■ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. २७ : डीकेएएससी महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली.

प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे अशी त्यांची नावे आहेत. स्पर्धा पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे होतील. प्रिया चव्हाणने सांगलीतील आंतरविभागीय कनोईंग स्पर्धेत सी १ - २०० मी., ५०० मी. प्रकारात सुवर्णपदक पटकावले. प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत के१-२०० मी., ५०० मी. प्रकारात सुवर्णपदक मिळवले. सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे, गणेश बरगाले यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2024
पुढारी



# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च व एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. या ३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या आहेत.

या परीक्षांसाठी १३ हजार ९६१ विद्यार्थ्यांपैकी ९७६ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. दि. २७ मार्च, २०२४ रोजी सदर पथकाकडून सांगली १६, कोल्हापूर- १३ सातारा- १ असे तिन्ही जिल्ह्यातून एकूण ३० गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

2 8 MAR 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# विद्यापीठ परीक्षेत ३० कॉपीचे प्रकार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. बुधवारी झालेल्या परीक्षेला १३ हजार ९६१ पैकी १२ हजार ९८५ विद्यार्थी उपस्थित होते. तर ९७६ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून सांगली १६, कोल्हापूर १३, सीतारा १ असे तिन्ही जिल्ह्यातून ३० कॉपीच्या प्रकारांची नोंद केली आहे. परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी होऊन गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या आधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.